Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47023

ISSN 2319 - 8508
AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY
RESEARCH JOURNAL

# GALAXY LINK

Volume - IX, Issue - II
May - October - 2021
English / Marathi /
Hindi Part - I

Impact Factor /
Indexing
2019 - 6.571
www.sjifactor.com



Ajanta
Prakashan

# CONTENTS OF ENGLISH PART - I


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | The Climate Change Aspect to Study the Challenges in Effect of Ecological Order<br>**Dr. Anil Kumar** | 1-4 |
| 2 | Central Government Contribution to Resettlement of War-Widows and their Dependents<br>**Lt. Dr. R. P. Gawande** | 5-10 |
| 3 | A Study of Legal Aspect for Covid -19 Positive Disabilities Person Room for Improvement<br>**Dr. Rinky Bharti**<br>**Dr. Anil Kumar** | 11-15 |
| 4 | Flourishing Corporate Life by Enunciating Diverse Cultural Perspectives in the Progressive Organization for the Effective Human Resource Management<br>**Parul Agarwal**<br>**Dr. Kritika Singh** | 16-22 |
| 5 | A Critical Study to International Human Rights of Access to Justice in Constitutional of India<br>**Satya Prakash Yadav** | 23-25 |
| 6 | Magnetic Behavior of $Zn^{2+}$ and $Pb^{4+}$ Co-substituted $Ni_1Zn_xPb_xFe_{2-2x}O_4$ Ferrites<br>**Sandesh R. Bhitre** | 26-30 |
| 7 | The Conceptual Study of Human Rights and Humanitarian Law<br>**Dr. Anil Kumar**<br>**Dr. Rinky Bharti** | 31-37 |
| 8 | The Impact of Information and Communication Technology in Academic Libraries<br>**Dhanushyam Jayajirao Gavli** | 38-42 |
| 9 | Women Leadership in Panchayat Raj System<br>**Dr. Sanjay Kishan Bhalerao**<br>**Dr. Bhagwan Shankarrao Waghmare** | 43-47 |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | बोरकरांची कविता आणि पार्थिव अपार्थिव<br>**आनंद वसंत डूडूल** | १-६ |
| २ | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चा बी एड कोर्स वर झालेला परिणाम - एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. कांबळे गोविंदराव शंकरराव** | ७-१४ |
| ३ | उच्च शिक्षण व बदलते शैक्षणिक धोरण : २०२०<br>**प्रा. डॉ. रत्ना जवरास** | १५-१९ |
| ४ | राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा इतिहास व विकास<br>**डॉ. वैशाली देशमुख** | २०-२३ |
| ५ | महात्मा ज्योतीराव फुलेंचे शिक्षणविषयक विचार<br>**डॉ. मधुकर चाटसे** | २४-२६ |
| ६ | कोरोना काळ आणि शिक्षणातील सकारात्मक व नकारात्मक बदल<br>**डॉ. सागर लोकनाथ बडगे** | २७-३० |
| ७ | महिला सबलीकरण आणि औरंगाबाद शहरातील स्वच्छतागृहांची स्थिती : एक आढावा<br>**मनिषा माधवराव निकम** | ३१-३७ |
| ८ | भारतीय संघराज्य आणि प्रादेशिकवाद<br>**ईश्वर सुभाष तांबे** | ३८-४३ |
| ९ | राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार<br>**विजय लिंबाजीराव कोल्हे** | ४४-४८ |
| १० | मराठी साहित्यातील थोर लेखकांच्या अनुवादाचा आढावा<br>**प्रा. रमेश बलभीम जाधवर** | ४९-५२ |

# १. बोरकरांची कविता आणि पार्थिव अपार्थिव

**आनंद वसंत डूडूल**
कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा.

पार्थिवात अपार्थिव भोगणारी कविता

बोरकर गोव्यातील मुक्त संस्कृती अनुभवत असतांना कौटूबिक संस्कारामुळे संतकाव्याशी विशेषतः ज्ञानेश्वराशीही नाळ जोडू शकले 1966 मध्ये प्रसिद्ध झालेल्या गितारच्या प्रस्तावनेत त्यांनी त्यांच्यावरील संतकाव्य संस्काराचा कृतज्ञतापूर्वक व आनंदाने उल्लेख केला आहे संतकाव्यातील मधुराभक्ती रसासक्त बोरकरांना विशेष भावली या मधुराभावामुळे त्यांच्या कवितेला जे वळण मिळाले ते बोरकरांची वृत्ती बघता स्वाभाविकच होते त्यांच्या इंद्रीयासक्तीला त्यात वाव मिळाला प्रणय,निसर्ग आणि अध्यात्म यांचे एकजीव रसायन करण्यात बा भ बोरकरांची प्रतिभा यशस्वी ठरली

*सर्व पार्थिव पसा–यातून अपार्थिव चैतन्याची आनंदस्फुरने पाहणे, ओळखणे आणि वेचणे अन सर्वांचे जीवन आनंदगान करुन टाकणे हा येथल्या प्राचीन परंपरेतील विचार साधनेचा आजपर्यंत वाहत आलेला एक संपन्न प्रवाह आहे टागोर–अरविंद या मार्गाने फार उंचावर पोहचलेले श्रेष्ठ कवी तांबे तेवढया उंचीचे नसले, तरी याच मार्गावर चालणरे निष्ठावंत पर्थिक, बोरकर ताब्यांचे ऋण मानून पण त्यांच्यापेक्षा या वाटेने कितीतरी पुढे गेले.*[1]

या. रा.चिं. ढेरेंच्या मतप्रकटनातून बोरकरांचा आनंदवादी दृष्टिकोण पुरेसा स्पष्ट होतो रा. चि. ढेरेंप्रमाणे गो. म. कुलकर्णींनी या परंपरेमध्ये बोरकरांचे स्थान निश्चित केले. व अध्यात्म हा बोरकरांच्या कवितेचा बीजमंत्र मानला. खुद् बोरकरांनीही काव्यसाधलेला अध्यात्म साधनाच मानले होते. समृद्ध प्रणय जीवन लाभलेल्या बोरकरांच्या कवितेतून पार्थिवाच्या सोहळयातच अपार्थिव भोगण्याची वृत्ती दिसते. त्यामूळे मधुराभाव उत्कटपणे रंगतो तो असा–

निळी होउनी उठली राधा पिळूं लागली केश
मोर होउनी गिळूं लागला जल मौक्तीक ह्रषिकेश
पिसापिसातून फुटूं लागले नक्षत्रांचे नेत्र
या चित्राने रात्र जाहली अक्षय मीलन क्षेत्र

राधाकृष्णाच्या मीलनाच्या धुंद चित्राला भोवतालचा निसर्ग पोषक होतो. पाठोपाठ येउन कोसळणा–या सरींना संवादी अशी दृत गती लय बोरकरांच्या प्रतिमा स्वीकारतात. सरी आणि गोकुळ एकजीव झाल्याचे प्रत्ययकारी चित्रण सरीवर सरी मध्ये प्रस्तुत आहे. पावसात भिजणा–या गोपी,त्यांच्यावर हलके हलके अंमल गाजविणारा अनंग असा हा शृंगार शारीरिकतेकडे झुकतो. सरीमुळे जणू सृष्टीमध्ये